महासागर
गुरूवार, दि. ११ सप्टेंबर २०२५
गडचिरोली
पान ३

## बेकायदेशीरपणे गर्भलिंग निदानवर कारवाई

**चंद्रपूर** : गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर करून बेकायदेशीररित्या गर्भलिंग निदान करणे व गर्भपात करणे हा कायद्याने गुन्हा आहे. असे करणाऱ्या विरुद्ध कडक कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील विस कलमी सभागृहात आयोजित या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, अतिरिक्त पोलिस अधिक्षक ईश्वर कातकडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, डॉ.भास्कर सोनारकर, डॉ. नयना उत्तरवार तसेच आरोग्य विभागातील विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## त्रिंबकस्वामी देवस्थानात महाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव

**चंद्रपूर** - येथील विठ्ठल मंदिर वॉर्डातील श्री त्रिंबक स्वामी देवस्थानात पुण्यश्लोक श्री त्रिंबक स्वामी महाराज पुण्यतिथी उत्सव भाद्रपद वद्य पंचमी दि ११ सप्टेंबर २०२५ ते द्वादशी दि.१८ सप्टेंबरपर्यंत उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. ११ सप्टेंबरला श्री गणेश व महाराजांच्या समाधीला रुद्राभिषेक पुण्यतिथी निमित्त केला जाऊन कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. विद्यावाचस्पती स्वानंद पुंड यांचे १२ सप्टेंबर ते १४ सप्टेंबरपर्यंत सायंकाळी ७ वाजता 'श्री गणपती अथर्वशीर्ष' ह्या विषयावर प्रवचन होणार आहे. १६ सप्टेंबरला श्री गणपती अथर्वशीर्ष आवर्तन अभिषेक - सकाळी ८ वाजतापासून होणार असून महाप्रसाद सकाळी १० ते २ पर्यंत होणार आहे.

# अत्याधुनिक बॅडमिंटन हॉलमुळे जिल्ह्यातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकीक प्राप्त करतील

### आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास, डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार मेमोरियल महाराष्ट्र मिनी स्टेट सिलेक्शन बॅडमिंटन स्पर्धा-२०२५'चे उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० सप्टेंबर :** चंद्रपूरमध्ये उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक बॅडमिंटन हॉलमुळे जिल्ह्यामध्ये दर्जेदार खेळाडू निर्माण होतील. मुंबई-पुण्यातील खेळाडूं प्रमाणेच भविष्यात चंद्रपूर जिल्ह्यातील खेळाडू देखील राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये नावलौकीक प्राप्त करतील व चंद्रपूरचा मान वाढवतील, असा विश्वास राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

चंद्रपूर जिल्हा क्रीडा संकुल येथे, चंद्रपूर जिल्हा बॅडमिंटन डेव्हलपमेंट असोसिएशन तर्फे डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार मेमोरियल महाराष्ट्र मिनी स्टेट सिलेक्शन बॅडमिंटन स्पर्धा-२०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन आ. ना. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.




या कार्यक्रमाला महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव सिद्धार्थ पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड,चंद्रपूर जिल्हा बॅडमिंटन डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश चांडक, अनिरुद्ध जोशी,सचिव जुवेल चांदेकर, तालुका क्रीडा अधिकारी नंदू आवारी, जवाहर पंजाबी, आदित्य गलांडे, विक्रांत पटवर्धन, जयश्री देवकर, रंजना सेवतकर, खेळाडू व पालकांची उपस्थिती होती.

आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'गेल्या वर्षीप्रमाणे यावर्षीदेखील गिरीश चांडक यांनी बॅडमिंटन स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन केले. मागील वर्षी बॅडमिंटन हॉलच्या सोलार सुविधेसाठी ९५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. पुढील स्पर्धेपूर्वी हॉलसाठी जनसेट (जनरेटर) बसविण्यात येईल. जिल्ह्यातील खेळाडूंना सोयीसुविधांची उणीव भासू नये यादृष्टीनेच मोठ्या शहरांच्या ताकदीचा अत्याधुनिक बॅडमिंटन हॉल चंद्रपूरमध्ये उभारला गेला आहे. भविष्याचा वेध घेत नरेंद्र मोदी यांनी २०३६ च्या ऑलिंपिकमध्ये अमेरिका, रशिया आणि चीनच्या बरोबरीने भारतही पदक जिंकणारा देश असेल असा विश्वास व्यक्त केला आहे. या विश्वासाला सार्थ ठरविण्यात चंद्रपूर जिल्हा मागे राहणार नाही, हा संकल्प करण्यात आला आहे.'

चंद्रपूर क्रीडा संकुलात अत्याधुनिक वातानुकूलित बॅडमिंटन हॉल उभारण्यात आला आहे. बल्लारपूर स्टेडियम मध्येही लवकरच वातानुकूलित हॉल तयार होणार आहे. तसेच म्हाडाच्या १६ एकर जागेवर तब्बल १३७ कोटी रुपये खर्चून क्रांतिवीर बाबुराव शेडमाके यांच्या नावाने १० कोर्ट असलेला भव्य वातानुकूलित बॅडमिंटन हॉल तयार करण्यात येणार आहे. महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनने चंद्रपूरमध्ये वेस्टर्न झोन स्पर्धा आयोजित करण्यास तयारी दर्शविली आहे, ही चंद्रपूरसाठी गौरवाची बाब ठरेल. क्रीडा क्षेत्रात जगाच्या बरोबरीने पुढे राहण्यासाठी ठोस पावले उचलण्याची आवश्यकता आहे. कारण मैदानावर उतरणाऱ्यांचे मन, बुद्धी आणि शरीर सदैव निरोगी राहते आणि त्यातूनच समाजाला उत्तम आरोग्याचा लाभ होतो.

चंद्रपूरमध्ये उत्तमोत्तम क्रीडा सुविधा तयार करण्यात आल्या याचा अभिमान आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच अंडर-१९ स्पर्धेचे आयोजन मोठ्या शहराऐवजी बल्लारपूर तालुका स्टेडियमवर करण्यात आले. या स्पर्धेत देशातील २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांतील खेळाडूंनी सहभाग नोंदविला. स्पर्धेनंतर खेळाडूंनी मिळालेल्या उत्तम सुविधांचे कौतुक करत अभिमानाची भावना व्यक्त केली. याशिवाय विद्यापीठाची इंटर-युनिव्हर्सिटी स्पर्धाही यशस्वीपणे पार पडली. खेळाडूंना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहेत. स्टेडियमच्या नूतनीकरणासाठी ५७ कोटीं रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहे. म्हाडा येथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील बाबुराव शेडमाके यांच्या नावाने १३७ कोटींचे भव्य स्टेडियम उभारले जात आहे.आर्चरीसाठी साडेआठ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

वन अकादमी येथे १५ कोटी रुपये खर्ची करून स्टेडियम याशिवाय पोलीस फुटबॉल ग्राउंडवरही १५ कोटींचे स्टेडियम उभारण्यात येत आहे, असे आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

# चंद्रपुरात महाविकास आघाडीचे जोरदार आंदोलन

### महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयकाचा विरोध

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १० सप्टेंबर** :महाराष्ट्र सरकारने पावसाळी अधिवेशनात सादर केलेल्या जनसुरक्षा विधेयक २०२४ विरुद्ध चंद्रपूरच्या गांधी चौकात महाविकास आघाडीने तीव्र आंदोलन केले. हे विधेयक लोकशाहीच्या मूल्यांना मुठमाती देणारे असून, हुकूमशाही प्रवृत्तीला खतपाणी घालणारे असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. विरोधकांनी या कायद्याला 'काळा कायदा' असे ठामपणे घोषित केले आहे.

या आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष रितेश रामू तिवारी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे राजेंद्र वैद्य, महिला जिल्हाध्यक्ष बेबीताई उईके,



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे सुरेश पचारे, कम्युनिस्ट पक्षाचे अरुण भेलके, तसेच महाविकास आघाडीतील सर्व पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलनात सहभागी सर्व मान्यवरांनी एकमुखाने सांगितले की, 'राज्यघटनेने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हा कायदा घाला घालतो. आधीच अस्तित्वात असलेल्या कायद्यांद्वारे सुरक्षा व्यवस्थापन शक्य आहे; त्यामुळे नवीन कायद्याची गरजच नव्हती. हा कायदा नक्षलवाद्यांच्या नावाखाली जनतेचा आवाज दडपण्यासाठी वापरण्यात येणार आहे. सरकारविरोधात बोलणाऱ्यांना, पत्रकारांना तुरुंगात डाकण्यासाठी या कायद्याचा गैरवापर होईल. जनसुरक्षा कायदा तात्काळ रद्द करण्याची जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. जर हा कायदा मागे घेतला गेला नाही, तर राज्यभर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

## बल्लारपूर येथे महाविकास आघाडीचे धरणे आंदोलन



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**बल्लारपूर, दि. १० सप्टेंबर :** महाराष्ट्र राज्य सरकार जनसुरक्षा कायद्याद्वारे लोकशाही व्यवस्थेचा गळा घोटत आहे. राज्यातील महायुतीच्या सरकारने महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा अंमलात आणण्यासाठी वाटचाल सुरु केली आहे. जनविरोधी कायदा करण्याची मागणी धरणे आंदोलनातून मंगळवार ( दि. १० ) रोजी महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करून केली.बल्लारपूर येथील नगरपालिकेच्या समोर धरणे आंदोलनातून जनसुरक्षा कायदा म्हणजे दडपशाहीचे धोरण असा तीव्र निषेध केला. धरणे आंदोलनातून जनसुरक्षा कायद्याचा प्रखर विरोध करण्यात आला. घोषणाबाजी करून महायुतीच्या सरकारच्या जनविरोधी धोरणाचा निषेध करण्यात आला. या प्रसंगी जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सुभाष धोटे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव घनश्याम मुलचंदानी, रोशनलाल बिट्टू,शहर कांग्रेसचे अध्यक्ष देवेंद्र आर्य,शिवसेना ( उबाठा ) चे उपजिल्हा प्रमुख विनोद उर्फ सिक्की यादव,राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष बादल उराडे, बल्लारपूर तालुका कांग्रेसचे अध्यक्ष गोविंदा उपरे, कांग्रेसच्या जेष्ठ नेत्या डॉ. रजनी हजारे,माजी अध्यक्ष अब्दुल करीम आदि उपस्थित होते.

# चिंतलधाबा येथे वृद्ध,दिव्यांगाच्या कल्याणासाठी आयोजन

### डीबीटी लाभ,आधार अपडेट,आयपीपीबीचे खाते गावातच होतील

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**पोंभुर्णा, दि. १० सप्टेंबर** :तालुक्यातील वृद्ध,दिव्यांगांना विविध शासकीय कामासाठी तहसीलच्या ठिकाणी येऊन काम करावे लागतात.शिवाय डिबीटीचे लाभ, आधार अपडेट, आयपीपीबीचे खाते यासारखे कामे करण्यासाठी तहसीलच्या ठिकाणी येऊन धावपळ करावी लागते. अनेकदा येण्या जाण्यामध्येच वेळ जात असल्याने बरेचदा चकरा माराव्या लागतात.वृद्ध व दिव्यांगांना याचा नाहक त्रास सहन करावा लागतो.वृध्द व दिव्यांगांना त्रास होऊ नये व अशी कामे गावातच व्हावे यासाठी माजी सभापती अल्का आत्राम यांनी तहसीलदार यांच्याकडे शिबीराचे आयोजन करण्याची मागणी केली होती.तहसिलदार यांनी तात्काळ चिंतलधाबा येथे दि.१२ सप्टेंबरला सामाजिक सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. पोंभूर्णा तालूका आदिवासी बहूल क्षेत्र आहे.काही गावांपासून तहसिलीचे ठिकाण असल्याने अनेकदा काहींना शासकीय कामे करण्यासाठी मोठी कसरत करावी लागते.वृद्ध, दिव्यांगांना तर मोठी धावपळ करावी लागते.सध्या निराधार, वृद्ध, दिव्यांगांना आधार अपडेट, केवायसी,डिबीटीचा लाभ, आयपीपीबीचे खाते यासारखे अनेक कामे करणे आवश्यक आहे.सदर काम करण्यासाठी तहसिलीच्या ठिकाणी येणे धावपळीचे आहे. अनेकदा दिव्यांग,वयोवृद्ध लोकांना होणारा त्रास बघता पंचायत समितीचे माजी सभापती अलका आत्राम यांनी तहसीलदार मोहनिश शेलवटकर यांना निवेदनातून मागणी केली होती.याची तात्काळ दखल घेत दि.१२ सप्टेंबरला चिंतलधाबा येथील सामाजिक सभागृहात कॅम्पचे आयोजन करण्यात आले.या कॅम्पमध्ये आधार अपडेट, केवायसी, डिबीटीचा लाभ, आयपीपीबीचे खाते, आयुष्यमान कार्ड व आभा कार्डच्या नोंदणी, अपघाती विमा,टर्म इन्शुरन्स नोंदणी,घरांचे सनद आदी कामे केल्या जाणार आहे.या कॅम्पमुळे गावातच अनेक कामे केल्या जाणार असल्याने वृद्ध, दिव्यांगाची दाखल्यांसाठीची धावपळ बंद होणार आहे.

निराधार,वृद्ध व दिव्यांगांना डिबीटी लाभ,आधार अपडेट व केवायसीच्या कामासाठी धडपड करताना पाहून.सदर कामे हे गावातच करता यावे यासाठी शिबीराचे आयोजन करण्यासाठी तहसीलदार यांचेकडे विनंती केली होती.तहसिलदार यांनी तात्काळ चिंतलधाबा येथे सदर कॅम्पचे आयोजन केले.यामुळे वृद्ध दिव्यांगांची धावपळ बंद होईल.

**अल्का आत्राम,माजी सभापती पंचायत समिती पोंभूर्णा**

चिंतलधाबा येथील कॅम्पमध्ये सेवा केंद्राच्या वतीने डिबीटी लाभ,सनद वाटप,आधार अपडेट्स,केवायसी,आयपीपीबी खाते उघडणे,अपघात विमा काढणे आदी कामे केल्या जाणार आहेत.या कॅम्पचा लाभ चिंतालधाबा,केमारा,देवई,भटार ी, खरमत,चेक बल्लारपूर,चेक आष्टा,सोनापूर व आष्टा या गावातील नागरिकांनी लाभ घ्यावा.असे शिबिर इतर गावातही घेण्यात येतील.

**मोहनिश शेलवटकर, तहसीलदार पोंभूर्णा**

# जनसुरक्षा विधेयक विरोधात महाविकास आघाडी मैदानात



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. १० सप्टेंबर :** महाविकास आघाडीच्या नेतृत्वात महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ च्या विरोधात बुधवारला चिमूर येथे आंदोलन करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे जनरल सेक्रेटरी डॉ सतीश वारजूकर, चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गजानन बुटके, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष डॉ विजय गावंडे पाटील, चिमुर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष प्रकाश पोतराजे, शिवसेनेचे देविदास गिरडे, सुरेश गजबे ,कवडू खेडकर, विवेक कापसे, कांग्रेस चे चिमूर शहराध्यक्ष अविनाश अगडे, पप्पू शेख, सुभाष बन्सोड, दिवाकर मेश्राम, बंडूजी हिवरकर, युवा नेते संदीप कावरे, विनोद राऊत, राजू चौधरी, युवक काँग्रेसचे प्रशांत डवले व कांग्रेस, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी कांग्रेस शरद पवार गट असंख्य पदाधिकारी तथा कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात येऊन राज्य सरकारने अमलात आणलेले महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक हे घटना विरोधी व लोकशाहीला बादक असून जनतेच्या मूलभूत हक्कास गदा आणणारे आहे . सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी व्हावी व हुकूमशाही यंत्रणा बळकट व्हावी हा सरकारचा कुटील हेतू आहे. त्यामुळे हे विधेयक रद्द करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली.

## बसस्थानकाचा प्रश्न ऐरणीवर, नव्या वास्तूचे काम अर्धवट

### अनेक बसेस रस्त्यावर, प्रवासासाठी सुविधांचा अभाव, एस टी विभागाचे दुर्लक्ष

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. १० सप्टेंबर :** नागभीड येथील बसस्थानक नव्याने बांधण्यात आले असून अजूनही वास्तूचे काम अर्धवट असून आगाराच्या बसेस रस्त्यावर उभ्या केल्या जातात तर प्रवासी ऊन वारा पाऊस आल्यास बस स्थानकात आसरा घेतात मात्र त्या ठिकाणी



शौचालय व लघुशंकेसाठी खुल्या जागेचा आसरा घ्यावा लागतो तर महिला प्रवाश्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. गेल्या कित्येक वर्षांपासून वास्तूचे काम सुरू असून पूर्णावस्थेत झाले नाही यामुळे प्रवाश्यांना त्रास सहन करावा लागत असून एस टी विभागाचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. बसस्थानकाचे लवकरच प्रवासासाठी खुले करावे अशी मागणी माजी शिवसेना तथा समाजसेवक प्रा योगेश गोनाडे यांनी केली आहे.

## शाहनवाज कुरेशी मित्रपरिवार तर्फे ईद ए मिलादून्नबी जल्लोषात साजरी

**महासागर प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १० सप्टेंबर :** जश्ने ईद ए मिलादून्नबीच्या निमित्ताने राजुरा शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेची सुरूवात जामा मस्जिद पासून करण्यात आली त्यात आबेंडकर चौक येथे शाहनवाज कुरेशी मित्र मंडलच्या वतीने मुस्लिम धार्मिक गुरु मौलाना तथा ईद कार्यक्रम घेणाऱ्या मंडळाचा तसेच माजी आमदार सुभाष धोटे व माजी नगराध्यक्ष अरुण धोटे यांचा शाल शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला .



यावेळी प्रामुख्याने मित्रमंडळ सदस्य तथा हिंदु मुस्लीम बांधव, हिंदु बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यामुळे शहरात हिंदु मुस्लीम एकतेचे प्रतीक दिसुन आले.

# महामार्गाचे काम संथ गतीने नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. १० सप्टेंबर :** कोणत्याही शहराचा विकास अपेक्षित असते. विकासाच्या नावाखाली जर नागरिकांच्या आरोग्याशी खेळ होता कामा नये.मात्र ब्रम्हपुरी शहरात महामार्गाचे काम कासव गतीने सुरू असल्याने त्याचे परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होताना दिसत आहे.संथ गतीने महामार्गाच्या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदारामुळे नागरिकांचे बेहाल होत असून नागरिक त्रस्त होऊन. सबंधित ठेकेदारावर कारवाईची मागणी करीत आहेत.

ब्रम्हपुरी शहरातून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक. ५५६ जात असल्यामुळे रस्त्याचे रुंदीकरणाचे काम कितेक महिन्यापासून कासव गतीने सुरू आहे. सदर महामार्ग ब्रम्हपुरी शहरातील ख्रिस्तानंद चौक ते भूतीनाला या वर्दळीच्या रस्त्यावरून जात आहे.

ब्रम्हपुरी वडसा रोड वरील होणाऱ्या महामार्गाच्या रस्त्यावर अनेक शाळा ,महाविद्यालय, रुग्णालय, बाजारपेठ असल्यामुळे या रस्त्याला चोवीस तास नागरिकांची व वाहनांची गर्दी असते.याच रस्त्याचे रुंदीकरणाचे काम करणाऱ्या ठेकेदारांनी मागील सात आठ महिन्यापासून कामाला सुरुवात केली. आदी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी नाल्या खोदून बांधण्याचे काम हाती घेतले ते काम म्हणजे एक ना धड भाराभर चिंध्या अशी अवस्था केली नालीचे बांधकाम संथ गतीने सुरू आहे नालीचे बरेच काम अपूर्ण असतांना व रस्त्यावर येणारे इलेक्ट्रिक पोल, वा रस्त्याच्या कामात येणाऱ्या बाबीची पूर्तता न करता.ख्रिस्तानंद चौक ते भूतीनाला या वडसा डांबरिंग पक्क्या रोड ला खोदून काढले. डांबरिंग पूर्णपणे काढल्याने रस्त्यावर गड्डे पडलेले आहेत . डांबरिंग काढल्याने संपूर्ण रस्ता मातीमय झाला त्यामुळे रस्त्यावर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे.त्याचबरोबर हा रस्ता चोवीस तास असल्याने व या रस्त्यावर वाहनाची मोठ्या प्रमाणात रेलचेल असल्यामुळे रस्त्यावर खूप जास्त धूळ निर्माण होतो या धुळीमुळे जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना विद्यार्थ्यांना या धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे.

ठेकेदाराच्या कासव गती रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे नागरिकांचे बेहाल होत आहे तसेच या धुळीमुळे अनेक नागरिकांना विद्यार्थ्यांना श्वसनाचा ,डस्ट एनर्जीचा त्रास होऊ लागलेला आहे. रस्त्यावर खड्डे असल्याने वाहन चालकांना मानेचा,कमरेचा त्रास होत आहे . रस्त्याच्या कडेला असलेले बाजारपेठ त्यांची दुकाने धुळीमय झालेले आहे. नागरिकांना होणारा त्रास याला जबाबदार कोण ठेकेदार की त्या कामाकडे लक्ष न देणारी शासकीय यंत्रणा? कोण जबाबदार असणार असा प्रश्न निर्माण होत आहे. संथ गतीने काम सुरू असून सुद्धा संबंधित प्रशासन कामाकडे दुर्लक्ष करीत आहे. धुळीच्या साम्राज्याचा सामना सामान्य नागरिकांना व त्यांच्या आरोग्यावर परिणाम होताना दिसत आहे

### लोकांचे आरोग्य धोक्यात. जबाबदार कोण?

ब्रम्हपुरी तालुक्यातील अनेक दिवसा पासून रोड कोरून ठेवल्यामुळे गेल्या कित्येक दिवसा पासून लोकांना अनेक समस्यांना सामोर जावे लागत आहेत कित्येक लोक श्वसनाचा आजारांना सामना करावा लागत आहे. याला जबाबदार कोण असा प्रश्न ब्रह्मपुरी स्थानिक लोकांना पडला आहे. या मुळे किती तरी लोकाना स्वतःचा जीव गमवाला लागला आहे. दवाखान्यात लोकांना नंबर घेत नाही ओपिडी फुल झाली आहे असं सांगण्यात येत आहे. जनतेनी जायच कुणाकडे व न्याय मागायच कुणाकडे रोड नि जाते किंवा येते वेळी ऑक्सीजन सिलेंडर घेहून फिरावे लागणार कि काय अशी भीती लोकांचा मनात निर्माण झाली आहे गेल्या कित्येक महिन्या पासून रोड कोरून ठेवले आहे ते काम कधी पूर्ण होणार यांचा कडे सर्व जनतेचे लक्ष लागून आहे. जिकडे तिकडे लोकांना सर्दी खोकला ताप अशा आजाराचा सामना करावा लागत आहे. हे सर्व रोड मुळे होत आहे. लोकांनी जगाचे कसे. याला जिम्मेदार कोण? याच उत्तर जनता मागत आहे. व नागरिक संतापही व्यक्त करीत आहे. नागरिकांना बरे वाईट झाले तर याला जबाबदार कोण हा प्रश्न आता नागरिक विचारू लागलेली आहे. तर संथ गतीने काम करणाऱ्या ठेकेदारावर उचित कारवाई करावी अशी मागणी नागरिकाकडून केली जात आहे.

# महसूल सेवक (कोतवाल) पदास शासकीय चतुर्थ श्रेणीचा दर्जा देण्याची मागणी

### १२सप्टेंबर पासून राज्यस्तरीय बेमुदत धरणे आंदोलन



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती दि. १० सप्टेंबर :** महाराष्ट्र राज्यातील महसुल सेवक (कोतवाल) या पदाला महसूल विभागाच्या चतुर्थ श्रेणीत समाविष्ट करावे या मागणीसाठी दि.१२सप्टेंबर पासून राज्यस्तरीय बेमुदत धरणा आंदोलन करणार आहे.

येथील कोतवाल संघटना तहसील कार्यालयाच्या आवारात आंदोलन करणार असल्याचे महसूल सेवक (कोतवाल) तालुका संघटनेचे अध्यक्ष दिलीप नागपुरे यांनी सांगितले.

महसूल विभागातील अत्यंत महत्त्वाचा कणा समजला जाणाऱ्या या पदाकडे शासनाचे दुर्लक्ष आहे. महाराष्ट्र राज्याच्या विविध योजना तसेच महसूल विभाग वगळता इतर कार्यालयाची कामे सुद्धा करावी लागतात. एवढे काम करून सुद्धा शासनाने अद्यापर्यंत कोतवाल पदास शासनाच्या वर्गीकृत कर्मचाऱ्या प्रमाणे सेवा सुविधा लागू केली.इतर महसूल कर्मचाऱ्या प्रमाणे शासकीय सेवा सुविधा देण्यासाठी चतुर्थ श्रेणीचा दर्जा देऊन अन्याय दूर करावा अन्यथा महसुल कोतवाल संघटना दि.१२सप्टेंबर पासून बेमुदत आंदोलन करणार असल्याचे नागपुरे यांनी प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

या मागणीला धरून कोतवाल संघटनेने निवेदन सुद्धा दिले आहे , निवेदन देताना संघटनचे दिलीप नागपूरे, संदीप रामटेके, राहुल जंगम, प्रकाश दुपारे व तालुक्यातील सर्व महसुल सेवक उपस्थित होते.

महासागर गडचिरोली
गुरूवार, दि.११ सप्टेंबर २०२५


## राणी अवंतीबाई चौकात बस थांबा द्या : व्यवस्थापकांना निवेदन

**गोंदिया :** खाजगी शाळा,सेवा निवृत्त शिक्षक-शिक्षकेत्तर बहुउद्देशिय संस्थेच्या वतीने राणी अवंतीबाई चौकात बस थांबविण्यात यावी या मागणीचे निवेदन राज्य परिवहन महामंडळाचे भंडारा विभाग नियंत्रकाच्या नावे गोंदिया आगार व्यवस्थापक येतीश कटरे यांना ४ सप्टेंबर रोजी देण्यात आले.

सदर निवेदनात यापूर्वी १० जुलै रोजी आगार व्यवस्थापकांना मागणीचे निवेदन देण्यात आले होते. या दरम्यान भ्रमणध्वनीवरुन व प्रत्यक्ष भेटून चर्चा देखील करण्यात आली होती परंतु ही चर्चा निष्फळ ठरली. बस थांबणे अजुन पर्यंत सुरु झाले नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणासाठी शाळेमध्ये ये-जा करतात. तसेच अवंती चौकातील रुग्णालयात सभोवतालच्या ग्रामीण भागातील नागरिक रुग्णांना घेऊन येतात. या ठिकाणी बस थांबा नसल्याने एक तर कुडवा नाका किंवा सरळ मग बसस्थानक येथे बस थांबत असल्याने रुग्णांना परत येण्या-जाण्याचा त्रास होत आहे. जनतेसाठी अवंती चौकातील बस थांबा पूर्ववत सुरु करण्यात यावा असा उल्लेख या निवेदनात करण्यात आला आहे.

आगार व्यवस्थापकांनी सदर निवेदन स्वतःच्या अभिप्रायः सह विभागीय नियंत्रकांना पाठविण्याचे आश्वासन दिले आहे. निवदेनाच्या प्रती आ. विनोद अग्रवाल व आ. विजय रहांगडाले यांना पाठविण्यात आल्या आहेत. निवेदन देते वेळी शिष्टमंडळाचे संस्थेचे पदाधिकारी अरुण पारधी, आनंद बिसेन,, उदेलाल हनवते, दुधराम राऊत, एस.एम.पटले, भगवानसिंह चव्हाण,मोहन पटले, मुन्नालाल हरिनखेडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# जीएमसी प्रवेशव्दारासमोरच घाणीचे साम्राज्य

### नाल्या सांडपाण्याने बरबटल्या : परिसरात दुर्गंधीचे वातावरण; आरोग्य धोक्यात




**गोंदिया :** येथील केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे सोपविण्यात आले आहे. त्यामुळे या परिसरातील स्वच्छतेची जबाबदारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासनावर आहे. मात्र, महाविद्यालय प्रशासनाकडून स्वच्छतेकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे थेट प्रवेशद्वारावरील स्थितीवरून स्पष्ट होते. मुख्य प्रवेशद्वाराजवळील नाल्या दुर्गंधीयुक्त सांडपाण्याने भरलेल्या आहेत, ज्यामुळे ज्यामुळे संसर्गजन्य आजारांच्या फैलावाची भीती निर्माण झाली आहे.

शहराच्या मध्यभागी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि केटीएस जिल्हा रुग्णालय आहे. येथे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यां व्यतिरिक्त शहरातील तसेच दूरदूरच्या भागातील रुग्ण मोठ्या संख्येने उपचारासाठी येतात. परंतु वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ घाण आणि कचऱ्याने भरलेले उघडी गटारे संसर्गजन्य आजारांना आमंत्रण देत आहेत एकीकडे, केंद्र आणि राज्य सरकार स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहरे आणि गावांमध्ये स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करत आहे. परंतु आजारांपासून आराम देणाऱ्या रुग्णालयांजवळील उघडे गटारे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया आणि विविध प्रकारच्या संसर्गजन्य आजारांचे केंद्र बनले असतील तर ती शोकांतिका म्हणावी लागेल. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सीमा भिंतीला लागून असलेल्या गटारांवर बांधलेले पदपथ अनेक ठिकाणी तुटले आहेत. प्रवेशद्वाराजवळच गटारे पूर्णपणे उघडे आहेत.

शहराच्या विविध भागातून येणारे घाणपाणी या नाल्यांमध्ये वाहत आहे. त्यामुळे दुर्गंधीही येत आहे. परंतु नगर परिषद प्रशासनासह कोणीही त्याची काळजी घेण्यास तयार नाही. रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक दिवसभर या ठिकाणी येत राहतात. पदपथांवर खाद्यपदार्थांसह अनेक लहान दुकाने आहेत. त्यामुळे येथे येणाऱ्या नागरिकांचे आणि दुकानदारांचे आरोग्यही गंभीर धोक्यात आले आहे. परंतु वैद्यकीय महाविद्यालय प्रशासन कुंभकरणीच्या झोपेत असल्याचे दिसून येते. जिथे रुग्णांचे नातेवाईक आजारातून बरे होण्याची आशा घेऊन त्यांना घेऊन येतात, तिथे रुग्णांसह नातेवाईकांचे आरोग्यही धोक्यात आले तर याला काय म्हणावे, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

### आता लोकप्रतिनिधींकडूनच अपेक्षा

वैद्यकीय महाविद्यालय प्रशासन किवा नगर परिषद या गंभीर विषयावर कोणतेही पाऊल उचलत नाही. यामुळे सामान्य नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. लोकप्रतिनिधींनीही याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. जर परिस्थिती सुधारली नाही तर केवळ रुग्ण आणि त्यांचे नातेवाईकच नाही तर वैद्यकीय महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना तसेच येथे शिक्षण घेणाऱ्या भावी डॉक्टरांनाही त्याचे परिणाम भोगावे लागू शकतात. या संदर्भात नगर परिषदेचे मुख्याधिकारी संदीप बोरकर यांच्याशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

# मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देऊ नये

### कुणबी समाज संघटनेचे राज्य शासनाला निवेदन



**सालेकसा :** मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र देऊ नये तसेच मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण न देण्याबाबत ८ सप्टेंबर सालेकसा तालुका कुणबी समाज संघटनेच्या वतीने तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण देण्याच्या संभाव्य निर्णयाला तीव्र विरोध दर्शविण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून कुणबी समाज व ओबीसी संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात येत असून सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने २ सप्टेंबर रोजी काढलेला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय हैदराबाद मधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी किंवा मराठा कुणबी किंवा कुणबी मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबत काढलेला निर्णय, हा ओबीसी समाजावर अन्याय करणारा आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावण्याचे काम करण्यात आले आहे. तेव्हा तो शासन निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा, अशी मागणीचे विनदेन मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले. मागणी मान्य न झाल्यास येत्या काळात रस्त्यावर उतरून विराट मोर्चा, आमरण उपोषण करण्याचा इशाराही ओबीसी समाजाच्या वतीने देण्यात आले आहे.

यावेळी कुणबी समाज संघटनेचे अध्यक्ष गौरीशंकर भेंडारकर उपाध्यक्ष निलेश बोहरे, यशवंत शेंडे सचिव महेश बागडे,कोषाध्यक्ष सचिन बहेकार, ओबीसी तालुका अध्यक्ष मनोज डोये,सहकोषाध्यक्ष विजय फुंडे, महेश खोकले, सरपंच चंद्रकुमार बहेकार, डॉ हिरालाल साठवणे,परसराम फुंडे , बाजीराव तरोने,नितेश शिवणकर, सुभाष हेमने, अरुण तावाडे, गोपीचंद शिवणकर, भाऊलाल शिवणकर, काशीनाथ पाथोडे रमेश चुटे अशोक खोटेले, परमानंद शिवणकर, गुणवंत तरोने सह अनेक कुणबी,ओबीसी समाज बांधव उपस्थित होते.

## संविधानाचे महत्त्व प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचले पाहिजे

### तालुका बौद्ध समाज संघाचा उपक्रम




**सडक अर्जुनी :** भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकास अधिकार देऊन स्वातंत्र्य समता न्याय अधिकार व बंधुता या आधारावर सर्वांना समानतेचा दर्जा दिला आहे मात्र आजही एक विश्वास शतकात उच्च नीचतेची भावना सामाजिक द्वेष पसरविण्याचे कार्य करण्यात येत आहे आणि आपल्या अधिकाराची जाणीव नसलेल्या अनेकांना या विसंगतीचा सामना करावा लागत आहे ही सामाजिक विषमता दूर व्हावी याकरिता तालुका बौद्ध समाज संघाच्या वतीने ४ सप्टेंबर रोजी सडक अर्जुनी तालुक्यातील ७ गावे ज्यामध्ये पांढरवाणी, केसलवाडा, रेंगेपार, कन्हारपायली, शेंडा, कोयलारी व पुतळी या गावात जाऊन संविधानाचे महत्त्व प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी तालुका बौद्ध समाज संघ यांच्या वतीने उपक्रम राबविण्यात येत आहेत,

कार्यक्रमात सर्वांसमवेत संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले यावेळी तालुका बौद्ध समाज संघाचे मार्गदर्शक अनिल मेश्राम, सुखदाजी मेश्राम, अशोकजी लांजेवार, भोजराज रामटेके, बिरला गणवीर, निखिल शहारे, संघटनेचे अध्यक्ष महेंद्र चंद्रिकापुरे, उपाध्यक्ष हंसराज राऊत, आशिष राऊत, संजय बन्सोड, सचिव रोहित जनबंधु सह सचिव पुरुषोत्तम रामटेके तसेच पदाधिकारी रजनिश मेश्राम, मनोज तागडे, दीक्षा भोवते, चंद्रकांता मेश्राम, हर्निला नंदागवळी, मनीषा शहारे,नीना राऊत व वेगवेगळया ठिकाणी अनेक नागरिक या उपक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाघाच्या हल्ल्यात जखमी व्यक्तीची आ. बडोलेनी घेतली भेट



**सडक अर्जुनी :** तालुक्यातील भदुटोला गावाजवळ दिनांक ६ सप्टेंबर रोजी वाघाने हल्ला करून रामदास कापगते हे जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच आज आमदार राजकुमार बडोले यांनी घटनास्थळी भेट देऊन जखमी व्यक्तीची विचारपूस केली आणि घटनेविषयी सविस्तर माहिती घेतली.

गावकऱ्यांमध्ये निर्माण झालेली भीती व असुरक्षिततेची परिस्थिती लक्षात घेऊन आमदार बडोले यांनी जखमी रामदास कापगते यांना उपचारासाठी शासनाकडून तात्काळ नुकसान भरपाई मंजूर करण्याची मागणी केली. तसेच उपवनरक्षक यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आणि प्रकरण तातडीने दाखल करण्याचे सांगितले.वन प्राण्यांमुळे वाढलेल्या हल्ल्यांमुळे गावकऱ्यांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी अशा सुचना आमदार बडोलेनी दिल्या. या भेटीदरम्यान पंचायत समितीचे सभापती चेतन वळगाये, जिल्हा महामंत्री प्रशांत शहारे, सुभाष कापगते, आत्माराम कापगते तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकरी म्हणून एकत्र येऊन लढा द्या: बच्चु कडु

### २८ ऑक्टोबरला मुंबई येथे कर्जमाफी आंदोलन



**तिरोडा :** कुण्या पक्षाची कुण्या जातीची नाही तर हे आमच्या शेतकऱ्याचे लढाई आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी २८ ऑक्टोबरला लढा देण्याकरता कर्जमाफी करीता मुंबईला आंदोलन करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांनी आंदोलनात सहभागी व्हावे, असे आव्हान बच्चू कडू यांनी मुंडीकोटा बाजार चौकात एलगार सभेत केले.

बच्चू कडू पुढे म्हणाले, शेतकरी कर्ज माफी दिव्यांग बांधव भुमिहिन मजुर, मेंढपाळ, असे अनेक प्रश्नाना धरुन मोठे आंदोलन मुंबईत करणार येणार आहे. सर्वात मोठा हा कोण असेल तर हा शेतकरी समाज आहे म्हणून आपण एक शेतकरी आहोत आणि शेतकरी लढा आपण देणार आहोत यासाठी सर्वांनी शेतकरी बंधाने एकत्र येऊन लढा देण्याकरता २८ ऑक्टोबरला मुंबई येथे एकत्र या असे सभेला आवर्जुन सांगितले . कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या फोटोला माल्यापण पण तसेच दीपपूजन करून करण्यात आली .मुंडीकोटा येथे बाजार चौकात एल्गार सभेत विशेष म्हणजे बच्चु कडु बैलगाडीतुन उभे राहून आणण्यात आले.

यावेळी सभेला महेंद्र भांडारकर प्रहार जिल्हाध्यक्ष ,पंचायत समिती सदस्य वनिता भांडारकर, प्रहार तालुका अध्यक्ष प्रदीप निशाने, संपर्कप्रमुख रमेश कारेमोरे महेंद्र नंदागवळी सचिव, गुंडू बोपचे , रवी फुलजले, वामन हजारे, सुरेन्द्र सुर्यवंशी, तिलक पारधी, सह प्रहार जनसत्ती पक्षाचे कार्यकर्ते सह महिला व शेतकरी ,युवक यावेळी उपस्थित होते.बच्चू कडू यांनी शाल श्रीफळ देऊन उत्कृष्ट शेतकरी विनोद काटवले तसेच टोलीराम पटले सत्कार करण्यात आला.अदानी प्रहार संघटना कार्यकत्यानी २८ आक्टोबरच्या मुंबई लढा आंदोलनासाठी ११ हजाराची भेट यावेळी बच्चु कडुला देण्यात आली.

### 'निरोगी अन्न विरुद्ध जंक फूड' या विषयावर पथनाट्य



**तिरोडा :** पोषण सप्ताहाच्या निमित्ताने लिटिल फ्लॉवर अकादमी, तिरोडा येथे एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी 'निरोगी अन्न विरुद्ध जंक फूड' या विषयावर पथनाट्य सादर केले.

या नाटकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, टीमवर्क आणि निरोगी जीवनशैलीबद्दल जागरूकता पसरवण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांनी गटांमध्ये विभागणी करून नाटकात विविध भूमिका बजावल्या. मुख्याध्यापकांनी शिक्षकांच्या टीमला आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले आणि त्यांच्या सहभागाचे कौतुक केले आणि पथनाट्याद्वारे लोककल्याणकारी कार्यात अर्थपूर्ण कामगिरी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

## गुरुदेव सेवा महिला मंडळाचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान

### महाराष्ट्र शासन गणेशउत्सव मध्ये सहभाग



**तिरोडा :** शासनाच्या वतीने आयोजित गणेशउत्सवात सहभाग घेत तिरोडा तालुक्यातील परसवाडा पं.स. क्षेत्रातील पिपरिया येथील गुरुदेव सेवा मंडळाने छान भजन, गायन केल्याने गोंदिया येथील जलाराम लॉन येथे जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

भजन गायनामध्ये गायिका लिलावती शुकला,डुलन लीलारे, ढोलक मास्तर मनूलाल लीलारे, बेंजोवाडक राजतीलक लीलारे, तबला वादक ओमप्रकाश शुकला, उर्मिला बागडे, शालू मेश्राम, दुर्गा लीलारे, मंगला मस्करे, किसना बागडे, शोभेलाल लीलारे, दुर्गा लीलारे, भिहारी मस्करे, यांनी साथ दिली. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक भामरे, निवासी उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी पाटी, तहसीलादर समशेर पठाण, नायब तहसीलादर गडपळीवार आदी सांस्कृतीक महोत्सवात उपस्थित होते. कार्यक्रमचे संचालन आपत्तीवेवास्तापण अधिकारी चोबे व आभार मंजुषा देशपांडे यांनी मानले.

## नाटक हे समाज सुधारण्याचे उत्तम साधन : ढेंगे



**अर्जुनी मोर :** नाटक हे समाज सुधारण्याचे उत्तम साधन आहे समाजाचे प्रतिबिंब हे नाटकाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम लेखक नाट्यकला वंताच्या माध्यमातून करीत असतात. नाटकातील चांगला आशय घेऊन वाईट ते सोडून द्यावे असे प्रतिपादन गोंदिया जिल्हा परिषदेचे माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती उमाकांत ढेंगे यांनी केले. ते इटखेडा येथील बाजार चौकातील ओम साई सांस्कृतिक कला मंडळाच्या वतीने आयोजित कुंकू कुणा मागु मी या नाटकाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. या प्रसंगी या नाट्यप्रयोगाला उद्घाटक म्हणून सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष सुभाष देशमुख, महाराष्ट्र ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेचे राज्य संघटक संतोष रोकडे, डॉ. पुरुषोत्तम चांदेवार, रोहित भावे ,बबलू करंजकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

# पानगाव ते कहाली रस्ता गेला खड्ड्यात

**सालेकसा :** तालुक्यातील पानगाव-कहाली हा रस्त्या मध्य प्रदेश राज्याच्या सिमेला जोडतो. परंतु या मार्गाची आजघडीला दैनावस्था झाली आहे. या मार्गावर जागोजगारी मोठ-मोठी खड्डे पडल्याने वाहनधारकांसह विद्यार्थी व शेतकऱ्यांना प्रवास दरम्यान तारेवरची कसरात करावी लागत आहे. तेव्हा या समस्येवर स्थानिक जनप्रतिनिधींनी लक्ष केंद्रीत करून रस्त्या बांधकामासाठी पाठपुरावा करावी, असी मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे.

मध्यप्रदेश राज्याच्या सिमेला जोडणारा पानगाव-कहाली रस्ता आजघडीला आपली अखेरची घटका मोजत आहे. एवढेच नव्हेतर तालुका हा छत्तीसगड व मध्यप्रदेश राज्याच्या सिमेल असल्याने या मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. परंतु आजघडीला कहाली-पानगाव रस्त्याची दैनावस्था होऊन जागो-जागी मोठ मोठी खड्डे पडले आहे. तसेच खड्ड्यातील गिट्टी सुद्धा रसत्यावर पसरल्याने प्रवास दरम्यान अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. उल्लेखनीय असे की, सद्या पावसाचे दिवस सुरू असल्याने रस्त्यातील खड्ड्यात पाणी साचत असल्याने वाहन धाकांना खड्ड्यात अंदाज येत नसल्याने अनेकदा वाहनधारकांना अपघाताला समोर जावून किरकोळ जखमी सुद्धा व्हावे लागत आहे. त्याच प्रमाणे कहाली-पानगाव या मार्गावरील पानगाव, मुंडीपार, बच्चनटोला, खडखडीटोला, कोवाचीटोला, जांभळी, बाकलसरा, कहाली या गावातील नागरिक सुद्धा याच मार्गाने ये-जा कराতত. तसचे शालेय विद्यार्थी सुद्धा शिक्षणासाठी सालेकसा, देवरी, आमगाव तसेच गोंदिया ला याच मार्गाने ये-जा करतात. दरम्यान खड्डेमय मार्गावमुळे विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागत आहे.

### प्रशासनासह लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष



परंतु रस्त्याच्या झालेल्या दैनावस्थेकडे सार्वजनिक बांधकाम तसेच स्थानिक जनप्रतिनिधीचे दुर्लक्ष झाल्याने रस्ता केव्हा दुरुस्त होणार? असा सवाल गावकऱ्याकंडून उपस्थित केला जा आहे. तसेच एखादी अप्रिय घटना घडल्यावरच प्रशासन व जनप्रतिनिधींना जाग येणार का असा सतप्त सवालही उपस्थित केला जात आहे. तेव्हा स्थानिक लोकप्रतिनिधी या मार्गाच्या समस्येकडे लक्ष केंद्रीत करून रस्त्या दुरुस्ती पाठपुरावा करावा, अशी मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे.

RNI No-MAHMAR 2010/35845 महासागर गडचिरोली
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, एकदा मार्केट, चामोर्शी रोड, गडचिरोली येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र माहेश्वरी फोन ९४०५६६०५५५, ९८३४२३०४३०/०७१३२-२३२७७३ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहिल.)

